Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)

**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# शांताबाई शेळके यांचे लौकिक व वांङ्मयीन व्यक्तिमत्व

**स्मिता मुरलीधर पालेकर**
संशोधक विद्यार्थी
तायवाडे कॉलेज कोरडी नागपूर.
(मो. ९१५६६२८८६२)

---

***सारांश :***

*शांताबाई शेळके हे नाव सगळ्यांना परिचित आहे. महाराष्ट्रात त्यांचे नाव घरोघरी रोज ऐकले जाते. त्यांनी लिहिलेली चित्रपट गीते, कोळी गीते, भूपाळी, पदरचना, आरती काही मधुर गीते व लोकप्रिय गीते दिवसाच्या वेगवेगळ्या प्रहरामधून आकाशवाणीवरून ऐकवली जातात. तसेच ध्वनिक्षेपकावरून गावागावात, शहराशहरात लहरत असतात. शांताबाईचे कित्येक गीते महाराष्ट्रातल्या ख्यातनाम गायकांनी गायिलेली, प्रतिभावंत, संगीतकार आणि दिग्दर्शकांनी स्वरबद्ध केलेली गीते अनेकांना मुखपाट आहे. गीतलेखन करण्याआधीपासूनच त्या उत्तम काव्यरचना करीत होत्या, त्या चांगल्या कवयित्री तर आहेतच आणि त्यासोबतच त्या उत्तम गीतकार सुद्धा आहे. हे मात्र सर्वसामान्य लोकांना फारसे माहित नव्हते. परंतु सातत्याने काव्यलेखन करीत असलेल्या सत्तावन - अठ्ठावन वर्षाचे लेखन, उत्कृष्ट कविता एकत्रित स्वरूपात वाचकांपुढे यावे हा उद्देश सिद्ध केला आहे.*

**बीजशब्द :** शांताबाई, लौकिक, गीतकार

---

**प्रस्तावना:**

शांताबाई शेळके यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९२२ मध्ये पुणे जिल्ह्यात इंदापूर या गावी देवांग कोष्टी या विणकर समाजात झाला. त्या काळाच्या परिस्थितीनुसार घरात किंवा जातीत शिक्षण या गोष्टीचा गंधही कुणाला नव्हता आणि ब्राह्मणेत्तर समाजात जन्माला आल्यामुळे त्या काळाच्या परिस्थितीनुसार लवकरात लवकर लग्न करणे हेच त्यांचे नशीब होते. पण शांताबाई चे भाग्य सर्वसाधारण मुलींसारखे नसून ते अत्यंत विलक्षण होते. त्यावेळी त्यांच्या कुटुंबात मुलीनां मात्र थोडेसे शैक्षणिक वातावरण दोन्हीकडील आजोळपासून मिळाले. ग्रामीण आणि नागरी या दोन्ही ठिकाणी शांताबाईवर संस्कार घडल्या गेले. शांताबाईनी अनुभवलेले जग तसे मर्यादित होते. खेड - मंचर सारख्या मध्यमवस्तीच्या गावात सामावलेले आणि तेही कोष्टांसारख्या अडाणी समाजाशीच निगडित होते. भाषा, पोशाख, राहणी, जेवणखान, चालीरीती या सगळ्यांचे संस्कार शांताबाई वर झाले.

**बालपण:**

शांताबाईला धरून दोन बहिणी, दोन भाऊ, आईबाबा त्यांना शांताबाई दादा- वहिनी असे म्हणत. आई - वडील शिक्षण प्रेमी मिळाले तेही साहित्यात आवड असलेले, वडील फॉरेस्ट ऑफिसर असल्यामुळे सतत बदली आणि त्यातही मुंबई - पुण्याला गेले की भरपूर पुस्तक विकत आणायचे. शांताबाईची आई इयत्ता चौथीपर्यंत

शिकलेली होती म्हणून शांताबाईंना प्राथमिक शिक्षण घरीच मिळाले. शांताबाईच्या आईना वाचनाची विलक्षण आवड असल्यामुळे वडिलांनी आणलेली पुस्तके त्यांची आईच भराभर घरची कामे संपवून मोठ्या आवडीने पुस्तके वाचायची. त्यामुळेच शांताबाईंची वाचनाची आवड कायम राहिली. आईबरोबर त्यांचे नाते मायलेकीपेक्षा मैत्रिणीचे जास्त होते. त्यामुळे त्यांच्या लहानपणापासून त्यांना कोणी मित्र मैत्रिणी नव्हत्या.

शांताबाईचे बालपण म्हणजेच खेड (राजगुरुनगर) व मंचर ही त्यांची आजोळ. तेथे त्यांचे बालपण गेले या गावी शांताबाईंच्या वडिलांचा म्हणजे शेळक्यांचा मोठा वाडा. तिथेच त्यांना कविता, ओव्या या गाण्याची आवड त्यांच्या आईकडून प्राप्त झाली. शांताबाईची आई मोठी सोशिक होती. जातीने गोष्टी जरी असली तरी तिथल्या बायकांचे नटणे,सवरने, तेथे दाराशी येणाऱ्या "भिक्षेकऱ्याकडून, जात्यावर दळणाऱ्या आजी, आईकडून, नागपंचमीला फांद्यावर बांधलेला झोका, फेर धरून नाचणाऱ्या गावकरणीकडून शांताबाईंनी इतकी गाणी ऐकली की, कविता कळण्या आधी त्यांना कळू लागले."१

मंचरच्या या साऱ्या आठवणी वयाच्या आठ - नऊ वर्षापर्यंतच्या. पुढे शांताबाईचे वडील वारले. त्यामुळे ती गावे, गावाबाहेरच्या बंगल्यातले राहणे, ती झाडे पाने त्याचबरोबर डोंगर, झाडे, वेली, फुले, आणि वेळोवेळी पाळलेली मांजरे, घोडी, वेगवेगळा दरवळणारा सुवास, त्यांच्या मनात गोळा होणाऱ्या आठवणी ह्याचेच विशेष स्मरण शांताबाईंना आहे. ते सारे एका क्षणात सुटले. "रंगीत चित्राचे एखादे पुस्तक अकस्मात मिटून जावे तसे काहीसे मला वाटते. माझे वडील गेले आणि शांताबाईची आई स्वतःच्या घरी मालकिणीच्या रुबाबात राणीसारखे आयुष्य काढलेल्या, त्यांना शेवटी दिराचा आसरा घ्यावा लागला आणि माझे बालपणही संपले होते."[२] असे त्या म्हणतात.

**शिक्षण:**

१९३८ साली पुण्याच्या हुजूरपागा शाळेतून मॅट्रिकची परीक्षा पास होऊन शांताबाईने शाळेचा निरोप घेतला. हा पाच वर्षाचा काळा निरतिशय प्रसन्नतेने आणि ज्ञान साधनेच्या विशुद्ध,निर्मळ, आनंदात गेला. त्यानंतर काकांनी सर परशुराम भाऊ कॉलेजात माझे नाव दाखल केले. पण खरे तर त्यांना फर्ग्युसन कॉलेजला जायचे होते. त्यांच्या बहुतेक सर्व मैत्रिनिनी फर्ग्युसन कॉलेजला नावे घालून मोकळ्या झाल्या होत्या. पण काकांनी त्यांचे नाव सर परशुराम भाऊ कॉलेजला दाखल केले होते. त्या कॉलेजमध्ये शिक्षण घेणे हे आयुष्यातील एक अत्यंत भाग्यशाली योग होता. सुरुवातीला ब्राह्मणांचे कॉलेज म्हणून भीती, संकोच, उदासीनता होती. पण नंतर कॉलेज जीवननाच्या उसळत्या वेगवान चैतन्यमय प्रवाहने त्यांना स्वतः बरोबर खेचून घेतले. ते कॉलेज म्हणजे महासागरच होता. त्या कॉलेजमधल्या मोकळ्या सुसंस्कृत वातावरणात मी वावरत होते. तेथे मिळणाऱ्या शिक्षणातून नवनवे संस्कार मनावर होत होते.

"वाचनप्रेम हे माझ्या जीवनातील पहिले प्रेम आहे. त्या प्रेमापोटी मी जन्मभर पुस्तके गोळा करीत राहिले आहे. पुस्तकाची मानसिकताच नव्हे तर शारीरिक जवळीकही मला फार हवीहवीशी झाली. त्यांचा स्पर्श जुन्या पुस्तकांचा चॉकलेट सारखा गोड वास, नव्या पुस्तकांचा ताजा वास सारे मला विलक्षण प्रिय आहे."[३]

साहित्याची आवड असणाऱ्याला आपणही काही लिहून बघावे असे वाटणारे कॉलेजचे प्रोत्साहक

वातावरण होते. कॉलेजचीस्वतःची अशी एक वाङमयीन परंपरा होती. महामोहपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप आणि दबदबा कॉलेजवर होता. श्री.म. माटे यांच्यासारख्या स्वतंत्र प्रज्ञेचा विचारवंत आणि रसाळ शैलीचा लेखक, वक्ता, प्राध्यापक, विद्यार्थ्यांना लाभले होते. जुन्या संत वाङ्मयाची आवड माटूयानीं त्यांना लावली. प्राध्यापक के. ना. वाटवे हे संस्कृत साहित्याचे रसज्ञ जाणकार होते. विद्यार्थ्यांबद्दल त्यांच्या मनात जिव्हाळाही असे. यांच्यामुळे शांताबाईंना वाचनाची गोडी लागली. शांताबाई थोडे लिहूही लागल्या होत्या. कॉलेज नियतकालिकांसाठी त्यांनी लेख लिहिला होता. प्राध्यापक माटे सरांनी तो वाचला व शांताबाई दिसताच 'तुझा लेख मी वाचला' छान लिहिला आहेस, असे कौतुक त्यांनी केले होते. तेव्हाच शांताबाईंनी मनात रुजवून टाकले की आपण लेखक व्हायचे.

१९४४ साली शांताबाई एम. ए. झाल्या बी. ए. ला हुकलेले पारितोषिक एम. ए. ला पदरात पडले. कॉलेजनेही त्यांचे यथोचित कौतुक केले. कॉलेजच्या प्राध्यापकांनी एक छोटासा समारंभच घडवून आणला. तात्यासाहेब केळकर यांच्या नावे ठेवले गेलेले केळकर सुवर्णपदक पहिल्याच वर्षी शांताबाईंना मिळाले म्हणून या समारंभाला केळकर मुख्य पाहुणे या नात्याने उपस्थित राहिले होते. अध्यक्ष म्हणून वामन मल्हार जोशी आले होते या दोन वडीलधाऱ्या आदरणीय साहित्यिकांनी पाठीवरून फिरवलेला कौतुकाचा हात हा शांताबाईंच्या कॉलेज जीवनाचा सुंदर पूर्णविराम होता. त्याने शांताबाई धन्य-धन्य झाल्या तेथे त्यांना आदरणीय गुरु भेटले. त्यांचे काव्यप्रेम तेथेच अंकुरले. जन्मभर पुरतील अशा अभ्यासू सवयी त्यांना लागल्या. लाजाळूपणा जाऊन धीटाई आली, आत्मविश्वास बळावला ज्या तात्यासाहेबांबरोबर एकदा लहान तोंडी मोठा घास घेऊन त्यांनी वाद घातला होता त्याच तात्या साहेबांनी तोंड भरून त्यांचे कौतुक केले होते.

'सर परशुराम भाऊ' कॉलेजने शांताबाईंना घडविले. पुढे ज्या शांताबाई रसिकांच्या मनावर ठसल्या त्याची ही पायाभरणी होती.

**लेखन:**

शांताबाई १९४४ साली एम. ए. झाल्या तो काळ रविकिरण मंडळातील कवीच्या प्रभावाचा होता. एस. पी. कॉलेज शेजारीच 'वाङमय शोभे' चे कार्यालय होते. स्वतः केलेल्या कविता शांताबाई मनोहरपंत केळकरांकडे नेऊन देत, शेवटी न रहावून केळकर त्यांना म्हणाले की, तू स्वतः एक स्त्री आहेस. मग तुझ्या कवितातील नायक 'तो' कसा आहेस ग? कवीने नेहमी स्व अनुभवातून लिहावे. १९४७ साली प्रसिद्ध झालेला 'वर्षा' व १९५६ साली प्रसिद्ध झालेला 'रूपसी' या दोन्ही काव्यसंग्रहातील कविता शब्दबंबाळ, सांकेतिक भावूक म्हणूनच रवीकिरण मंडळाच्या प्रभावातून लिहिले. याची कबुली शांताबाई स्वतः जाहीरपणे देतात. पण त्या वेळच्या त्यांच्या कविता खऱ्या नसतीलही, पण कवीपण मात्र अस्सल होते. त्या वेळेचा काव्यविषयक उत्साह खरा होता तो भारलेपणा अस्सल होता. त्यांना कविता लिहिताना जो आनंद वाटे. त्यात आर्थिक लाभाचा विचार चुकूनही कधी येत नसे. त्यातून त्यांना कवितेची आवड निर्माण झाली. तेव्हा तर स्वप्नरंजनात रमून जाण्याच्या वृत्तीची व या आवडीची अशी काही सांगड जमली की ध्यानी-मनी- स्वप्नी कवितेशिवाय दुसरे काहीच दिसत नाही या साऱ्यातून माझ्या लेखनाला प्रेरणा मिळाली.

१९७५ मध्ये प्रसिद्ध झालेला शांताबाईचा तिसरा काव्यसंग्रह 'गोंदण' तेव्हापासून त्यांच्या स्वयंप्रज्ञ प्रतिभेची जान, साक्ष रसिकांना पटू लागली. कविता लिहिणे हा नुसता छंद नाही, नुसती कारागिरी नाही, ती एक काळजाला जाऊन भिडणारी स्वतःकडे आणि जगाकडे बघण्याची अगदी वेगळी दृष्टी देणारी एक शक्ती आहे. तो आनंद आहे, तसेच वेदनाही आहे. १९४८ च्या सुमारास शांताबाई अत्र्यांच्या 'नवयुग' मध्ये आल्या. शांताबाईचे वाचन अफाट होते व तो आनंद इतरांबरोबर लुटायला त्यांना आवडायचं, "अत्र्यांनी आणखी एक महत्त्वाचं काम केलं, लेखन करायचं म्हणजेच प्रतिभेचं प्रस्फुरण झालं पाहिजे, वगैरे लेखन विषयीच्या माझ्या डोक्यातील साऱ्या भ्रामक कल्पना त्यांनी झटकून टाकल्या. नियतकालिकात काम करताना कुठल्याही वेळेला, कसल्याही विषयावर विशिष्ट शब्दमर्यादेतील हुकुमी लेखनप्रसंगी जागा भरण्यासाठीही करावा लागतं. त्या गरजेतून माझी सदर लेखनाची कला विकसित होत गेली. पत्रकारितेन मला आस्वादक समीक्षा करायला शिकवलं आणि एकूणच एक लेखक म्हणून मला बरीच शिस्त लावली".[४] पण कालांतराने आत्र्यांच्या समिक्षकातेमध्ये संपादनाचं काम शांताबाई करीत असत. काही मतभेदामुळे शांताबाईने 'नवयुग' ची नोकरी सोडली. त्यामुळे त्या कुठे सदर लेखन कर, चित्रपटांचे अनुवाद कर, चित्रपटांसाठी गीते लिही, अश्या व्यावसायिक लेखनाकडे वळल्या. एखादी चांगली नोकरी न मिळाल्याने ललित लेखनाऐवजी हे पोटार्थी लेखन त्या करीत राहिल्या. त्यामुळे त्यांच्यातील स्वयंप्रज्ञ कादंबरीकाराचा लवकरच असतं झाला.

शांताबाईने कवितेइतक्याच आवडीने कथा लिहिणे सुरू केले. आणि लोकप्रिय असलेल्या शांताबाईने प्रथम प्रकाशित केला तो 'मुक्त आणि इतर गोष्टी' हा कथासंग्रह होय. शांताबाईच्या बऱ्याच कथा स्त्रीजीवनविषयक. शांताबाईंनी निखळ कलात्मक प्रेरणेपोटी तर कथा लिहिल्याच. पण दिवाळी अंक, वसंत किंवा इतर विशेषांकासाठी ही कथा लिहिल्या. आर्थिक गरजेपोटीही काही कथा लेखन त्यांनी केले. पत्रकारिता करता-करता सर्जनशीलतेचा दुवा कायम राखणाऱ्या लेखनाच्या नवनव्या वाटा त्यांना मिळाल्या. सात- आठ वर्षे त्यांनी पत्रकारिता केली. पत्रकारितेचे ऋण मानत असताना मुंबई शहराला सुद्धा धन्यवाद देतात. कारण पत्रकारितेतूनच आस्वादक समीक्षक करायला शिकले व बरीच शिस्त लागली.

शांताबाईनी गीत लेखनाला सुरुवात केली ती कुणाच्यातरी सांगण्यावरून. क्षणाचाही विलंब न लावता शांताबाईंनी सिनेमासाठीची अनेक गाणी लिहिली. त्यातील काही गाणी लोकप्रिय ही झाली तर काही गीतातून. कवितातून रसिकांशी मुक्तपणे हृदयसंवाद साधण्यात त्या यशस्वी झाल्या. 'शांताबाई गीतकार म्हणून घडल्या त्या अपघाताने!' तिथे शांताबाईच्या गीतलेखनाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. चित्रपटासाठी किंवा ध्वनिमुद्रिकासाठी गीते लिहिताना सुरुवातीला नेहमीप्रमाणे आर्थिक गरज तर होतीच, पण नंतर मात्र हा प्रकार शांताबाईंना इतका आवडू लागला की, केवळ त्या आनंदापोटी असे भरपूर गीत लेखन त्यांनी केले.

शांताबाईचे लेखन - वाचन एकसुरी झाले नाही. कारण संस्कृत ,मराठी,इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेतील साहित्याचा आस्वाद घेण्याची त्यांची वृत्ती आहे. या चौफेर साहित्य परिशीलनामुळे त्यांच्या लेखनामागील घटना- प्रसंगांना खुलवणारे अनेक साहित्यिक संदर्भ येत राहतात. व त्यांच्या प्रासंगिक लेखनाला ही अभिजात समृद्धीचे परिणाम होतात. आजूबाजूला वावरणाऱ्या माणसांकडे पाहण्याची कुतुहलपूर्ण दृष्टी ऐकूनच मानवी जीवन व मानवी स्वभावाविषयीची उत्कटता, मानवी जीवनातील कण न कण शांताबाई टवटवीत मनाने

अनुभवतात आणि आपल्या अकृत्रिम नितळ,जाणवेल न जाणवेल अशी स्वतःची एक लय असलेल्या भाषेत शब्दरूप देतात. विशेषतः चिंतनशीलता सधन आशयगर्भता, पारदर्शी शब्दकळा यामुळे शांताबाईंचे लेखन एखाद्या नितळ, स्वच्छ तळ्यासारखे शांत व सागरासारखे अथांग झाल्याचे जाणवते.

**व्यवसाय:**

शालेय जीवनात त्यांना काव्य लेखनाचा छंद लागला. रविकिरण मंडळापासून कव्यालेखनाची प्रेरणा घेऊन ही आवड त्यांनी जोपासली. त्यांचे आवडते कवी माधव ज्युलियन यांच्या काव्याने त्या प्रभावित झाल्या होत्या. त्यांच्या कविता शब्दशः आचरणात आणल्याचे जाणवते. शब्दांचे व त्यांना शब्द गोळा करण्याचे अतिशय वेड होते. ग्रामीण संस्कृतीत गेलेले त्यांचे बालपण आणि त्या वेळच्या आठवणी मुळातच असलेली सखोल वाचनाची आवड व त्यांना पुण्याच्या सर परशुरामभाऊ कॉलेजमध्ये त्यांचे शिक्षण झाले. त्यांना अनेक साहित्यप्रेमी साहित्यिक आणि त्यांच्या सखोल साहित्यविषयक संस्कारातून त्यांनी टिकवून ठेवलेली साहित्याची गोडी यातूनच त्यांच्या व्यवसायाला सुरवात झाली.

शांताबाई अत्र्यांच्या 'नवयुग' मध्ये काम करण्यासाठी पुण्याहून मुंबईला गेल्या आणि वृत्तपत्र व्यवसायात प्रवेश केला. "वृत्तपत्र व्यवसायामध्ये पाच – सहा वर्षे काम केलें. त्यावेळी आचार्यांनी त्यांना कटाक्षाने साधे, सुबोध रसाळ, मराठी लिहण्याची सवय लावली. व जन्मभर पुरेल अशी शिदोरीच तेथे जमवली. शांताबाईचें मुंबईत पदार्पण होताच आचार्य अत्रे, मामा वरेरकर यांच्या सारख्या दिग्गजांच्या सहवासात त्या आल्या हा त्यांचा तेथील शुभारंभ होता."[५] अत्रे यांच्या संपदानाखली निघणाऱ्या ' समीक्षक ' या मासिकात प्रथम लेखन केल्यानंतर काही काळानीं ते मासिकं चालत नसल्यामुळे बंद पडले आणि त्यानंतर त्या अत्र्यांच्याच 'नवयुग' साप्ताहिकात काम करू लागल्या. त्यातून त्यांना त्यावेळी खूप काही शिकायला मिळाले. वृत्तपत्र व्यवसायाबरोबर स्तंभ लेखन करणे,मुलाखती घेणे, इंग्रजी लेखनाचे अनुवाद करणे, पुस्तक परीक्षण करणे, एखाद्या सभेचा वृत्तांत लिहिणे, प्रुफ तपासणे अशा अनेक खुब्या त्यांना या व्यवसायात कळल्या. शांताबाई हळूहळू कामात रमू लागल्या जीवन किती समृद्ध आहे गुंतागुंतीचे आहे हे शांताबाईंना 'नवयुग' मुळेच कळले आणि जन्मभर पुरेल अशी शिदोरी त्यांना मिळाली एका वर्षासाठी आलेल्या शांताबाईंनी तब्बल ४० वर्ष आयुष्यातील सर्वाधिक काळ मुंबईत घालवला. "वृत्तपत्र व्यवसायात शांताबाई शिरल्या आणि लेखणीचे नवे उपयोग त्यांना कळू लागले. जी लेखणी आवडीने छंद म्हणून हाती घेतली ती वेळप्रसंगी पैसे मिळवून देऊ शकते हा तिचा व्यवहारिक उपयोग समजला आणि जो केवळ जीवाचा विरंगुळा होता, छंद होता त्याचा धंदा बनला."[६]

शांताबाईचा मूळचा व्यवसाय प्राध्यापिकेचा नसला तरी बापूसाहेब मेटे यांच्या मदतीने नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजमध्ये मराठी प्राध्यापिकेची एक वर्ष नोकरी त्यांनी केली. आणि त्यानंतर त्यांना प्राध्यापिका हा व्यवसाय अत्यंत प्रिय झाला. आणि पुढे प्राध्यापिका म्हणून मुंबईचे सिद्धार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स, रुईया कॉलेज नंतर परळचे महर्षी दयानंद कॉलेज येथे वीस वर्षे मराठीची प्राध्यापिका म्हणून त्यांनी काम केले. त्यात त्यांना खरा आनंद समाधान मिळाले मनाला चैतन्य देणारे, उत्साहवर्धक हे काम शांताबाईंनी सव्वीस – सत्तावीस वर्ष सेवानिवृत्त होत पर्यंत सातत्याने केले. मुंबईत असतानाच फिल्म सेन्सॉर बोर्डाच्या त्या सदस्य झाल्या. त्यानंतर त्या

सिद्धार्थ कॉलेजात शिकवत असताना शांताबाईची सेन्सॉर बोर्डवर नेमणूक झाली आणि त्यानंतर त्यांनी पंधरा वर्ष बोर्डावर काम केले. सेन्सॉर वर काम करत असताना त्यांच्या त्यांचा व्यक्तिमत्व विकास घडत गेला. त्यासोबतच त्यांची हुशारी, कर्तबगारी, व्यवहाराविषयी माहिती सुसंस्कृतपणा त्यामुळे ज्ञानात वेगळी भर पडली. “मुंबईला शांताबाईंनी वेगवेगळ्या प्रकारचे उद्योग केले. अनेक सरकारी आणि खाजगी समित्या, फिल्म सेन्सॉर बोर्ड आणि ड्रामा सेन्सॉर बोर्ड, रेडिओ आणि दूरदर्शन, चित्रपट सृष्टी आणि हीज मास्टर्स व्हाईस कंपनी, मासिके आणि वृत्तपत्रे, लेखक आणि प्रकाशक यांच्याशी शांताबाई घडून आला.”[७] पुण्यामध्ये वांङमयीन अभिरुची आणि विद्या मिळाली, तर खऱ्या अर्थाने मुंबईमध्ये अर्थार्जनासाठी लेखनाचे अनेक दरवाजे खुले झाले.

लहान मुलांचा जसा ‘कोनपालट’ करतात, तसा ‘कोनपालट’ शांताबाईंनी केला नि तो त्यांना लाभला; वयाच्या ५०व्या वर्षापर्यंत त्यांना फारसे मानसन्मान मिळाले नाही, त्यांची स्थान प्रामुख्याने केवळ एक रसिक श्रोती म्हणूनच राहिले. अर्थात आज जसे पायलीचे पासरीभर साहित्य पुरस्कार झालेत, तेवढे त्या काळात नव्हतेही, साहित्याला मानधन नाही मिळाले, तरी नुसते ते छापून आले तरी कौतुक वाटावे असे ते दिवस होते. आणि थोडेफार पुरस्कारही मिळायला सुरुवात झाली. १९८८ साली त्यांना डेक्कन बालमित्र मंडळचा ‘कै. यशवंतराव चव्हाण पुरस्कार’ मिळाला. १९९१ साली ‘जन्मजान्हवी’ या नितांत तरल काव्यसंग्रहाला कॉन्टिनेन्टल प्रकाशनचा ‘कुसुमाग्रज पुरस्कार’ मिळाला. १९९४ साली इचलकरंजीकरच्या फाय फाउंडेशनचा व मुलुंडच्या ‘सु.ल.गद्रे मातोश्री पुरस्कार’ मिळाला. अमेरिकेतल्या महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार मिळाला. १९९५ साली बोरीवलीचा ‘सरस्वती चोगले साहित्य पुरस्कार’ मिळाला, मात्र उत्कृष्ट गीत लेखनाबद्दलचा पुण्याचा ‘गदिमा’ पुरस्कार मिळाला, तेव्हा शांताबाई खऱ्या सुखावल्या.

**शांताबाई शेळके यांचे वांङमयीन व्यक्तिमत्व:**

मराठी साहित्यावर मनःपूर्वक प्रेम करणारे व्यक्तिमत्व म्हणजे शांताबाई शेळके. प्राप्त परिस्थितीशी आपले नाते कोमलतेने व नम्रतेने सांभाळणाऱ्या शांताबाईंनी आपले नाते जतन केले. शांताबाईची ही अर्धशतकापेक्षा जास्त व्रतस्थ अशी वांङमयीन कारकीर्द केवळ चकित करणारी आहे. शांताबाई म्हणजे मराठी साहित्यातील चालते बोलते साहित्य विश्व.

आईला वाचनाची आवड असल्यामुळे शांताबाईची वाचनाची आवड कायम राहिली. सगळ्या सहजप्राप्त अंगोपांगांना त्यांनी अगदी सहजतेने स्वीकारले. शांताबाईला त्यांच्या शालेय जीवनात लागणाऱ्या सर्व उपयुक्त गोष्टी मिळाल्या त्यामुळे त्या उत्तम साहित्यिक लेखिका घडत गेल्या. साहित्याच्या कुठल्याही विषयावर त्या बोलू व लिहू शकतात. त्यांच्या नसानसात, सळसळत साहित्यच दिसते. लेखन हा त्यांचा छंद, नाद, हौस त्यामुळे त्यांनी साहित्याचे नानाविध प्रकार हाताळले. कथा, कादंबरी, काव्य, व्यक्तिचित्रे, ललितलेख, संस्मरणे, आत्मकथन, गीते, चित्रगीते, लावण्या, बालगीते, स्फुटभाष्ये, समीक्षा, मुलाखती, अनुवाद अशा विपुल साहित्यातून वांङमयीन व्यक्तिमत्व घडत गेले. ते वांङमयीन व्यक्तिमत्व घडवण्यासाठी सर परशुराम भाऊ कॉलेजचा मोठा वाटा आहे. त्या कॉलेजची एक स्वतंत्र अशी वाङमयीन परंपरा होती.

प्रारंभीचा काळ संपल्यानंतर व्यावसायिक जीवनातील धावपळीची चाळीस वर्षे शांताबाईंनी मुंबईत

घालवली. पुण्याच्या सांस्कृतिक वांङमयीन वातावरणात त्या घडल्या. इथेच त्यांचे म्हणजे शांताबाईचे व्यक्तिमत्व आणि साहित्य अंकुरित झाले. यामध्ये शांताबाईचे वाङमयीन गुरु म्हणजेच श्री. म. माटे, रा.श्री. जोग, के.ना. वाटवे, आचार्य अत्रे, माधव जुलियन यांच्या वाङमयीन संस्कारातून शांताबाईच्या साहित्यिक जीवनाची जडणघडण होत गेली. त्यांनी 'मी'ला नेमकेपणाने जाणले होते. त्यामुळे कलात्मकता व व्यावसायिकता यांचा योग्य असा समन्वय साधणाऱ्या शांताबाईंनी 'जगणे आणि लिहिणे' हे एक स्वतंत्र निष्ठेने घडवून आणले. आयुष्यात यशस्वी साहित्यिक व्हायचे असेल तर प्रत्येकाने आपल्या वांङ्मयीन कारकिर्दीच्या प्रारंभीचा काळ तरी पत्रकारितेच्या मंडपाखालून जायलाच हवं असं शांताबाई म्हणतात.

**वांङमयीन गुरू:**

आचार्य अत्रे हे त्यांचे वांङमयीन गुरु. त्यांचा वारसा त्यांच्या शिष्या शांताबाईने मनापासून जपला. व पुढे नेला. शांताबाईंना शुद्धलेखनापासून ते लेखनातल्या बारीक बारीक गोष्टींचे त्यांना मार्गदर्शन मिळाले , वाचनातला योग्य दिशा मिळाली, लेखन व्यवहारात अनेक गोष्टी आचार्य अत्रे यांच्याकडून शिकायला मिळाल्या. शांताबाईना राजकारणात आवड जरी नसली तरी सुद्धा त्यांनी आचार्य अत्रे यांच्यासोबत 'नवयुग' मध्ये अगदी जवळून पाहिले. अत्रे सारख्या मुरलेल्या वृत्तपत्र व्यावसायिकांबरोबर काम करताना वृत्तपत्रीय लेखनातल्या खुब्या समजल्या. स्तंभलेखन करणे, मुलाखती घेणे, इंग्रजी लेखनाचे अनुवाद करणे, एखाद्या सभेचा वृत्तांत लिहून काढणे, मजकूर कमी पडला तर ऐनवेळी तो तयार करणे, पुस्तक परीक्षण लिहणे. अश्या नानातऱ्हेच्या लेखन करण्याची सवय त्यांना झाली. मुख्य म्हणजे स्फूर्ती, प्रतिभा, मूड लागणे, बैठक जमणे, या भानगडी शिवायही लिहिता आले पाहिजे हे त्यांना समजले. कारण खुद्द आचार्य अत्रे यांचे लेखन त्या रोज बघत होत्या. आचार्य अत्रे हे नुसतेच वृत्तपत्राचे संपादक नव्हते ते एक प्रतिभावंत, सृजनशील साहित्यिकही होते. त्यामुळे साहित्य विषयक अनेक गोष्टी त्यांच्याकडून शांताबाई शिकत होत्या.

माधव जुलियानांचे 'विरहतरंग' हे काव्य म्हणजे तरुण मंडळीचे बायबल होय. विरहतरंग, गज्जलांजली, स्वप्नरंजन या माधव जुलियानच्या काव्यांनी स्वप्नाळूपणा भावुकता, आदर्शवाद यांचा वस्तूपाठ सर्व तरुण मंडळींना घालून दिला होता. माधव जुलियनांना शांताबाईने प्रत्यक्ष पाहिले नव्हते तर त्यांच्या अपार प्रेमाचे व कृतज्ञेचे चिन्ह म्हणून त्यांनी आपला 'वर्षा' हा पहिला काव्यसंग्रह माधव जुलियन यांना अर्पण केला. शांताबाई म्हणतात माधव जुलियन यांच्या काव्याने मला अतिशय मुग्ध केले. शांताबाईंच्या काव्यात्मकतेचे पुष्कळसे संगोपन माधव जुलियन यांच्या काव्यामुळे झाले आहे असे मला वाटते. के. ना. वाटवे हे संस्कृत साहित्याचे सर्वज्ञ जाणकार होते. ते स्वतः ललित लेखन करीत नसेल तरीही नव्याने लिहिल्या जाणाऱ्या मराठी साहित्याबद्दल विशेषतः काव्याबद्दल त्यांना जागरूक असे. ते शिकवण्यात वाकबगार होते. विद्यार्थ्यांबद्दल त्यांच्या मनात जिव्हाळा होता. माटे आणि वाटवे हे दोन्ही प्राध्यापक शांताबाईंना खूप आवडते.त्यांचे वर्ग शांताबाई कधीही बुडवीत नसे.

शांताबाई वर श्री. म. माटे यांचा प्रभाव होता. कॉलेजात असताना साहित्य, कविता याची एक धुंदी चढलेली असे शांताबाई सर्वत्र घरीदारी या धुंदीतच वावरत होत्या. त्यावेळी शांताबाईचा एक कथासंग्रह प्रकाशित

झाला होता. माट्यांनी त्याला प्रस्तावना दिली पण नंतर चांगलंच खडसावलं ते म्हणाले, 'पांढरपेशा साहित्यिकांचे अनुभूती शून्य अनुकरण करण्यापेक्षा तू ज्या माती जन्मलीस त्या परिसरात वाढलीस त्याचे चित्र चित्रण कर त्याखेरीस त्यात जिवंतपणा येणार नाही.' असे सांगितले.

रा श्री जोग हे गुरु म्हणजे शांताबाईंना जुन्या संत वांङमयी गोडी माट्याने लावले तर आधुनिक मराठी कवितेचे प्रेम जोगानी त्यांच्या वृद्धीत निर्माण केले. अनेक जुने नवे कवी त्यांनी  कटाक्षाने त्यांच्याकडून वाचून घेतले. आधुनिक मराठी कविता हा जोगांचा प्रेमाचा जिव्हाळयाचा विषय होता. या कवितेच्या अध्ययन, अध्यापनात त्यांनी वर्षाच्या वर्षी घालवली. उत्कट काव्य प्रेम हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव होता. या काव्य प्रेमातून त्यांची समीक्षा निर्माण झाली. जोगांनी त्यांच्या कविता वाचल्या आणि त्यांना कवितेवर खूप बोलायला आवडतं तीच त्यांची आवड भरपूर भागवली. त्यांच्या ज्या कविता आवडल्या त्याबद्दल त्यांनी तोंड भरून शाबासकी ही दिली. शांताबाईच्या कवितांमध्ये व्याकरण शुद्धता आणि शैलीचा रेखीवपणा आहे. त्यांचे श्रेय जेवढे रविकिरण मंडळाच्या कवींना आहे तेवढेच ते जोग सरांनाही आहे.

**निष्कर्ष:**

१. शांताबाईला काव्याची प्रेरणा मिळाली ती रविकिरण मंडळाकडून. त्यात त्यांचा फार मोठावाटा आहे हे त्यांचे भाग्यच म्हणायचे. या वाङ्मयाची छाप त्यांच्या वांङमयीनव्यक्तिमत्वावर कायमचीच पडली.
२. कवितेकडे ओढून नेणारी पहिली गोष्ट म्हणजे 'शब्द' होय. या शब्द प्रेमातून त्यांच्या हातून विपुल साहित्य संपदा निर्माण झाली.
३. शांताबाईच्या अनेक कथांमधून वेगवेगळया प्रकारच्या व्यक्तिरेखा आलेल्या असल्या तरीही इतर लेखिकांच्या तुलनेत त्या पारंपारिक सरधोपटच आहेत.
४. लयबद्ध, नादमधुर, भावपूर्ण आशयघन, गीत रचनेसाठी शांताबाई ख्यातनाम आहेत. स्त्रीमनाचा आविष्कार, सहजता, प्रसन्नता, आणि गीतात्मकता ही त्यांच्या काव्यलेखनाची खास वैशिष्ट्ये आहे.
५. शांताबाईंनी सर्व साहित्यप्रकार सहजतेने हाताळले आहे. नवे विचार, नव्या जाणिवा, नवसाहित्य, या सगळयांचा परिणाम एकूणच साहित्यावर झाला.
६. शांताबाईना मिळालेल्या अनेक पुरस्काराने त्यांचे वांङमयीन व्यक्तिमत्व अधिकच खुलत गेले. त्यांना अनेक महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त झाल्या नंतर जनमानसात त्यांची प्रतिष्ठा अजूनच श्रेष्ठ ठरली.
७. शांताबाईना विद्यार्थीदशेत प्रेमळ गुरु लाभले व त्यांच्यावर वांङमयीन संस्कार झाले व त्यांच्या विचारांना प्रगल्भता मिळाली.आणि त्या बहुश्रूत चतुरस्त्र झाल्या.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


- शब्दव्रती शांताबाई - नीला उपाध्ये -मैत्रय प्रकाशन, सुधारित आवृत्ती २०१० पृ.२२
- धूळपाटी - शांता ज.शेळके - सुरेश एजन्सी, सहावी आवृत्ती २०१६, पृ.२८.
- शब्दव्रती शांताबाई - नीला उपाध्ये -मैत्रय प्रकाशन, सुधारित आवृत्ती २०१० - पृ.२०.

- तत्रैव – पृ.३४
- वडीलधारी माणसे – शांता ज. शेळके -सुरेश एजन्सी सहावी आवृत्ती २०१३ पृ.५१
- धूळपाटी शांता ज.शेळके - सुरेश एजन्सी, सहावी आवृत्ती २०१६, – पृ.२१०.
- शांताबाई - अनिल बळेल - स्नेहल प्रकाशन- प्रथमावृत्ती २०१९ पृ.५२.